**कामगार विभागाच्या अधिनस्त कार्यालयातील महिला कर्मचा-यांसाठी स्वच्छता गृहांची व्यवस्था करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१९५/कामगार-१०,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई ३२
दिनांक : १९ जुलै, २०१४

**शासन परिपत्रक**

महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य म्हणून संबोधिले जाते. भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत हक्क आणि अधिकार हा स्त्रियांच्या विकासाचा पाया आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शासकीय सेवेत महिलांना ३०% आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे शासकीय सेवेत महिलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शासनाच्या २०१४ च्या महिला धोरणानुसार महिलांना कामाच्या ठिकाणी सर्व सोयी सुविधा मुख्यत्वेकरुन स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तथापि, सदर मुद्दयांकडे बऱ्याचशा कार्यालयांकडून दुर्लक्ष होत आहे असे निर्दशनास आले आहे. राज्यातील महिला कर्मचाऱ्यांना सोयी सुविधा पुरविल्या जात नसल्याबाबतच्या तक्रारी शासनास प्राप्त होत आहेत, याची दखल घेऊन महिला धोरण, २०१४ ची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कामगार विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुखांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

(अ) कामगार विभाग व कामगार विभागाच्या अधीनस्थ कार्यालयांमध्ये असलेल्या महिला कर्मचाऱ्यांची व कामानिमित्त कार्यालयात येणाऱ्या महिला अभ्यागतांची संख्या फार मोठया प्रमाणात असते ही बाब लक्षात घेता प्रत्येक कार्यालयात प्राधान्याने महिलांसाठी पुरेशा प्रमाणात स्वतंत्र स्वच्छता गृहांची व्यवस्था करण्यात यावी.

(आ) ज्या कार्यालयांची इमारत शासकीय आहे त्या संबंधित कार्यालयाने इमारतीमध्ये महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय नसल्यास प्रस्तावित कामासाठी अर्थसंकल्पीय तरतुदीची वाट न पाहता सार्वजनिक बांधकाम विभागाशी तातडीने संपर्क साधून त्यांच्याकडे स्थापत्य कामासाठी असलेल्या अर्थसंकल्पीय उपलब्ध तरतुदीतून हे काम पूर्ण करुन घ्यावे. पक्के बांधकाम पूर्ण होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने तातडीची उपाययोजना म्हणून तात्पुरती पत्र्याची स्वच्छतागृहांची व्यवस्था हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून **४८ तासाच्या आत तातडीने** करण्यात यावी. व तसा एकत्रित अहवाल कार्यालय प्रमुखांनी शासनास तात्काळ पाठवावा.

(इ) भाडेतत्वावर असलेल्या इमारतीमध्ये कार्यालय असल्यास व तेथे महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय नसल्यास जागेच्या मालकाकडे तातडीने संपर्क साधून महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी. गरज भासल्यास तात्पुरती सोय म्हणून फिरते स्वच्छतागृह (Mobile Toilets) ची व्यवस्था करण्यात यावी. याबाबत महानगर पालिका / नगर पालिका किंवा संबंधित प्राधिकरणाकडे तातडीने संपर्क करण्यात यावा.

(ई) त्याचप्रमाणे कारखाने आस्थापनामध्ये सुद्धा महिलांसाठी पुरेशा स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था करणे संबंधित कारखाने व्यवस्थापन तसेच आस्थापना मालकांना बंधनकारक आहे. त्यांची ती जबाबदारी आहे. यापुढे कारखाने/आस्थापनांची नियमित तपासणी करताना महिला स्वच्छतागृहांची स्वतंत्ररित्या सोय आहे किंवा नाही याबाबत विवक्षितपणे नमूद करण्यात यावे तसेच अशी सोय नसल्यास ती आक्षेपार्ह बाब समजून संबंधितांवर खटले/दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. तसेच कारखाने

आस्थापनांच्या परवान्यांचे नूतनीकरण करताना महिला स्वच्छतागृहांची स्वतंत्ररित्या सोय केलेली नसल्यास परवान्यांचे नूतनीकरण करण्यात येऊ नये.

(ड) सर्वच महिला स्वच्छतागृहांची देखभाल / दुरुस्ती योग्यप्रकारे होईल याकडे कार्यालय प्रमुखांनी काटेकोरपणे लक्ष द्यावे. प्रत्येक कार्यालयात तसेच कारखाने आस्थापनांमध्ये कार्यालय/आस्थापनानिहाय किती महिला स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात आली आहे, याबाबतची एकत्रित माहिती कार्यालय प्रमुखांनी शासनास सादर करावी. स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्याबाबत आवश्यकता भासल्यास यासाठी स्वयंसेवी संस्थांची देखील मदत घ्यावी.

अशाप्रकारे कामगार विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुखांनी प्राधान्याने आपल्या अधीनस्थ असलेल्या सर्व कार्यालयांमध्ये ३ महिन्यामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहांची व्यवस्था करुन देण्यात यावी व महिला धोरण,२०१४ च्या तरतुदींनुसार महिला कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या सोयी सुविधा (स्वच्छतागृहे) उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना सर्व संबधितांना देण्यात याव्यात. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी त्या कार्यालयप्रमुखांची राहील.

सदर परिपत्रक कामगार विभागाच्या महाकामगार या संकेतस्थळावर तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 201407191713560010 असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अरविंद कुमार)

प्रधान सचिव (कामगार)
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी:-

१) सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) कामगार आयुक्त, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व, मुंबई.
३) विकास आयुक्त,असंघटीत कामगार,कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व, मुंबई.
४) कामगार विभागातील सर्व सह सचिव/उपसचिव/अवर सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, एलफिन्स्टन रोड, मुंबई.
६) संचालक, बाष्पके संचालनालय, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व, मुंबई.
७) संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व, मुंबई.
८) संचालक,ना.मे.लो.म.श्र.वि.संस्था, दादाभाई चमारबागवाला मार्ग, परेल मुंबई ४०००१२
९) प्रबंधक,औद्योगिक न्यायालय, प्रशासकीय इमारत, बांद्रा(पूर्व), मुंबई.